**प्रेसनोट** दिनांक १३/१२/२०१९

**आरोपी लोकसेवक राजशेखर शिवपुत्र कलशेट्टी वय ३८ वर्षे, पद– वैद्यकिय अधिकारी, वर्ग–२ व आरो लोकसेवीका श्रीमती चंदनबाला बबन एखंडे वय–४६ वर्षे पद–आरोग्य सेवीका वर्ग ३ दोघे नेमणुक – प्राथमीक आरोग्य केंद्र भादा ता. औसा जि. लातूर यांनी तकारदार यांना १५०००/– रुपयांची लाचेची मागणी करुन तडजोडीअंती १०,०००/- रुपयांची घेण्याचे मान्य करुन सदर लाचेची रक्कम आरोग्य सेवीका एखंडे यांनी वैद्यकिय अधिकारी कलशेटटी यांचे मार्फती स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांच्या विरोधात मौजे उंबडगा येथील सरपंच यांनी दिलेल्या तक्रारी अर्जात कार्यवाही न करणेसाठ वैद्यकिय अधिकारी व आरोग्य सेवीका यांनी तक्रारदार यांना १५,०००/–रुपये लाचेची मागणी करत असल्या बाबतची तक्र दिनांक १३/१२/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग, लातूर. कार्यालय येथे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने सापळा कार्यवाही केली असता सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांच्या विरोधात मौजे उंबडगा येथील सरपंच यांनी दिलेल्या तक्रारी अर्जात कार्यवाही न करणेसाठी वैद्यकिय अधिकारी व आरोग्य सेवीका यांनं तक्रारदार यांना १५,०००/–रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती १०,०००/–रुपये लाचेची रक्कम दोघांनी घेण्याचे मान्य करुन सदर लाचेची रक्कम आरोग्य सेवीका एखंडे यांनी वैद्यकिय अधिकारी कलशेटटी यांचे मार्फतीने प्राथमिक आरोग्य केंद्र भादा कार्यालयातील औषधी रुममध्ये पंचासमक्ष १३.४६ वा. पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. म्हणून त्याचे विरूध्द पोलीस स्टेशन भादा येथे कलम ७, १२ ला.प्र.का. १९८८ अन्वये गून्हा दाखल करण्यात येत आहे. सदर दोन्ही आरोपीस बी.पी. शुगरचा त्रास असल्याने लेखी नोटीस देवुन सोडण्यात आले आहे.

पुढील तपास पोलीस निरीक्षक कुमार दराडे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे, पोह/संजय पस्तापुरे, लक्ष्मीकांत देशमुख, पोना/चंद्रकांत डांगे, मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, पोकॉ/दत्ता विभुते,अशिष क्षिरसागर, शैलेश सुडे, संतोष गिरी, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १ | मा.श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग,परिक्षेत्र नांदेड | :– मोबाईल क्रमांक ८८८८८४१९६५ |
| २ | माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :– मोबाईल क्रमांक ९९२३६६६६४४ |
| ३ | कुमार दराडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल क्रमांक ९६५७७०९८४१ |
| ४ | बाबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल क्रमांक ९०६७२६६२६४ |
| ५ | टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :– १०६४ |
| ६ | कार्यालयाचा फोन क्रमांक | :– ०२४८२–२४२६७४ |
| ७ | Website | :– www.acbmaharashtra.gov.in |
| ८ | Mobile App | :– www.acbmaharashtra.net |
| ९ | Facebook Page | :– www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर